**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

क्र. : मुमाआ-२०२३/नों. क्र.५७६/त. क्र.१२३/२४/०१

प्रति,
श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (मालमत्ता)
म.न.पा. मुख्य कार्यालय, ४ था मजला, विस्तारीत इमारत,
महापालिका मार्ग, सी.एस.टी.मुंबई-४०० ००१.

| | | |
|---|---|---|
| तक्रारीचा दिनांक | : | १२-०४-२०२३ |
| सुनावणीचा दिनांक | : | २५-०४-२०२४ |
| तक्रारदार | : | अनुपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

तक्रारदार यांनी द्वितीय अपील क्र. मुमाआ/नों.क्र.११२/२०/अ.क्र.४९/२३/०१ मध्ये हज हाऊस समोर ऊड्डाण पुलच्या बाजूला ललित भाई बापाडीया चौक ते अण्णासाहेब दोंडकर मार्ग येथील पे पार्कींगची माहिती मागितलेली असून राज्य माहिती आयोगाने दि. ०९-०१-२०२३ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (मालमत्ता) श्री. ललितकुमार शहा यांना असे आदेश दिले होते की, अपिलकर्ता यांना अपेक्षित असलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ (४) व कलम ५ (५) प्रमाणे इतर संबंधित अधिकाऱ्यांशी व कार्यालयाशी समन्वय साधून ३० दिवसात माहिती प्राप्त करुन स्पीड पोस्टने निःशुल्क पाठविण्यात यावी.

तथापि अद्याप माहिती मिळाली नसल्याने तक्रारदार यांनी दि.१२-०४-२०२३ रोजी आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारदार अनुपस्थित. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (सुधार-३) श्री. ललितकुमार शहा उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी तक्रारदार यांनी विशद केले की, दि.०९-०१-२०२३ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारींनी माहिती दिली नाही.

अभिलेखावरुन स्पष्ट होते की, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (वा. व नि.) शहर-१ श्री.वैभव भागवत यांनी दि.०३-१२-२०१९ नुसार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि) ए विभाग यांना माहिती अर्ज वर्ग करुन त्यांचेकडून माहिती प्राप्त करावी असे अपिलकर्तांना उत्तर दिले.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि) ए विभाग श्री.सचिन काकडे यांनी दि.३१-१२-२०१९ रोजी अपिलकर्तांना हवी असलेल्या माहितीचे शुल्क कळवून शुल्क भरण्यासाठी चलन प्राप्त करुन घ्यावे असे उत्तर दिले. त्यानंतर जन माहिती अधिकारींनी काही कारवाई केली नाही.

सुनावणीच्या वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (सुधार-३) श्री. ललितकुमार शहा यांनी सूचित केले की, दि.०९-०१-२०२३ च्या आदेशान्वये कार्यकारी अभियंता, वाहतूक समन्वयक यांना माहिती देण्याचे सूचित केले होते. त्यानंतर सहाय्यक अभियंता, वाहतूक यांनी कार्यकारी अभियंता ए विभाग ला माहिती देण्यास सूचित केले. कार्यकारी अभियंता ए विभाग (श्री.शिवदास गुरव) यांनी काही कारवाई केली नाही.

सबब, आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

अंतरिम आदेश

१. तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जावर काहीही कार्यवाही केलेली नाही आणि त्याबाबतचा समर्पक खुलासा सुध्दा आयोगास सादर केला नाही. त्यामुळे अधिनियमाच्या कलम ७ (१) चा भंग केलेला असल्याने त्यांचे विरुध्द कलम २० (१) नुसार रुपये २५०००/- (रुपये पंचवीस हजार) इतका दंड का करु नये ? याबाबत खुलासा सादर करण्यास अंतिम संधी देण्यात येत आहे. सबब, याबाबतचा खुलासा आयोग आदेश प्राप्ती पासून १५ दिवसाच्या आत सादर करावा, अन्यथा, अपिलार्थीस जाणुनबुजून माहिती दिली नाही, असे समजून दंडात्मक कारवाई कायम करण्यात येईल.
२. अर्जदाराचा तक्रार अर्ज अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission Maharashtra

( समीर सहाय )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २५-०४-२०२४